## निसर्गानुभव २०१८ - मार्गदर्शक सूचना

1. पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर व्याघ्र प्रकल्प, उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य, टिपेश्वर अभयारण्य, व पैनगंगा अभयारण्य या ठिकाणी हा कार्यक्रम राबविण्यात येईल.
2. वय वर्ष १८ पूर्ण असणाऱ्या व्यक्तींनाच या कार्यक्रमात सहभागी होता येईल.
3. निसर्गानुभव कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन आरक्षण पद्धत अवलंबण्यात येईल. प्रत्यक्ष ऑनलाईन आरक्षण दि. १६ एप्रिल २०१८ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून दि. १८ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत करता येईल.
4. सहभागासाठी केवळ वनपरीक्षेत्राची निवड करता येईल. प्रत्यक्ष मचाण वाटप वनपरिक्षेत्र स्तरावर दि. ३० एप्रिल २०१८ रोजी उपस्थिती नोंदविल्यानंतर होईल.
5. पेंच व्याघ्र प्रकल्प व बोर व्याघ्र प्रकल्प येथील सहभागासाठी प्रती व्यक्ती रु. १,७००/- सहभाग शुल्क आकारण्यात येईल. तसेच उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य, टिपेश्वर अभयारण्य, व पैनगंगा अभयारण्य येथील सहभागासाठी प्रती व्यक्ती रु. १,२००/- सहभाग शुल्क आकारण्यात येईल. आरक्षण करते वेळी हे शुल्क ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.
6. आरक्षण देण्याबाबत अथवा रद्द करण्याबाबतचे सर्वाधिकार क्षेत्र संचालक यांनी राखून ठेवलेले आहेत.
7. आरक्षण निश्चित झालेल्या सदस्यांना याबाबत दि. २३ ते २४ एप्रिल दरम्यान त्यांनी नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर कळविण्यात येईल.
8. अशा व्यक्तींनी सोमवार दि. ३० एप्रिल २०१८ रोजी दुपारी २:०० वाजता संबंधित परिक्षेत्र कार्यालयास उपस्थिती नोंदवावी. यावेळी मूळ ओळखपत्र सोबत ठेवणे अनिवार्य राहील. येथून सदस्यांना मचाणावर बसण्यासाठी केवळ वनविभागाने नेमलेल्या वाहनांनीच नेण्यात येईल.
9. यावेळी सदस्यांना सायंकाळचे जेवण व पाणी सोबत देण्यात येईल.
10. उशीरा येणाऱ्या सदस्यांना कार्यक्रमात सहभागी होण्याची खात्री देता येणार नाही.
11. मंगळवार दि. १ मे २०१८ रोजी सकाळी ८:०० वाजता मचाणावरून उतरून पुन्हा संबंधित परिक्षेत्र कार्यालयास सदस्यांना पोहोचविण्यात येईल. अल्पोपाहारानंतर कार्यक्रमाचा समारोप होईल.
12. निसर्गानुभवादरम्यान सदस्यांनी मचाणावर बसून नोंदविलेली निरीक्षणे संबंधित परिक्षेत्र कार्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.
13. सहभागी होणाऱ्या प्रत्येक सदस्याने या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या पात्र असल्याबाबत नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीच्या (Registered Medical Practitioner) वैद्यकीय प्रमाणपत्राची मूळ प्रत मचाणावर बसण्यापूर्वी संबंधित परिक्षेत्र कार्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.

14. सहभागी होणाऱ्या प्रत्येक सदस्याने सोबतच्या बंधपत्राची प्रिंट काढून त्यावर स्वाक्षरी करून मूळ प्रत संबंधित परिक्षेत्र कार्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.
15. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्थानिक विद्यार्थ्यांना सहभागशुल्क रु. ५००/- भरून या कार्यक्रमात सहभागी होता येईल. यासाठी त्यांनी महाविद्यालयाचे मूळ ओळखपत्र, त्या भागातील रहिवासी असल्याचा पुरावा यासह संबंधित वनपरिक्षेत्र कार्यालयात दि. १६ एप्रिल २०१८ पासून दि. १८ एप्रिल २०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत नावनोंदणी करून सहभागशुल्क रोख भरावे.
16. एकदा भरलेले शुल्क परत करण्यात येणार नाही.
17. या कार्यक्रमादरम्यान छायाचित्रणास बंदी आहे. कोणत्याही प्रकारचा कॅमेरा सोबत बाळगता येणार नाही.
18. तंबाखू, बिडी. सिगारेट, मद्य, शस्त्र, टॉर्च इ. जवळ बाळगता येणार नाही.
19. अपरिहार्य परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास संपूर्ण कार्यक्रम कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प यांनी राखून ठेवले आहेत.
20. प्रशासनाचे नियम व कायदे यांचे पालन करणे प्रत्येक सदस्यावर बंधनकारक राहील.
21. वनविभागाचे कर्मचारी व वनविभागाच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्ती यांच्याशी सौजन्याने वागणे बंधनकारक आहे.

**बंधपत्र**

मी .................................... .................................... .................................... शपथेवर लिहून देत आहे की माझे वय दि. ३० एप्रिल २०१८ रोजी वय वर्ष १८ पेक्षा जास्त आहे. निसर्गानुभव कार्यक्रमात दु. ३:०० ते सकाळी ८:०० पर्यंत वनक्षेत्रात मचाणावर बसवायचे आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. मला कोणताही मोठा आजार नाही. या कार्याक्रमासाठीचे सर्व नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मी कोणत्याही नियमाचे, कायद्याचे उल्लंघन करणार नाही. निसर्गानुभव कार्यक्रमादरम्यान कोणत्याही दुर्घटनेत माझे नुकसान / इजा झाल्यास त्यासाठी मी स्वत: जबाबदार राहीन.

अर्जदाराची स्वाक्षरी - ..........................

दिनांक - ........... एप्रिल २०१८